**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 09.10.2023** **वारः सोमवार**

---

**ठळक बातम्या**

- इस्रायलमध्ये हमासबरोबरच्या संघर्षात आतापर्यंत 1000 हून अधिक जणांचा मृत्यू
- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून चार दिवसांच्या इटली आणि फ्रान्सच्या दौऱ्यावर
- पूरग्रस्त सिक्कीममध्ये बचाव आणि मदत कार्य युद्ध पातळीवर, सतराशे पर्यटकांना वाचवण्यासाठी सैन्याची शिकस्त आणि
- आयसीसी पुरुष विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताचा ऑस्ट्रेलियावर सहा गडी राखून विजय.

---

**इस्रायल-हमास**

हमाससोबत सुरु असलेल्या संघर्षात मरण पावलेल्या लोकांची संख्या एक हजारहून अधिक झाली आहे. यापैकी सातशे लोक इस्रायलमध्ये तर चारशे लोक गाझामध्ये मरण पावले आहेत. आणखी हजारो लोक जखमी झाल्याची भिती आहे. हमासच्या हल्लेखोरांनी काही भागांवर ताबा मिळवला आहे, त्यामुळं मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. इस्रायलचं लष्कर आणि हमासचे दहशतवादी यांच्या दरम्यान अनेक ठिकाणी युद्ध अद्याप सुरुच आहे. गाझामधील आठशेहून अधिक ठिकाणांवर हल्ले केल्याचा दावा इस्रायलनं केला आहे. त्यातील बेईत हनून हे शहर बहुतांशी सपाट झालं आहे. संयुक्त राष्ट्रांद्वारे गाझामध्ये चालवल्या जाणाऱ्या शाळांमध्ये किमान सत्तर हजार पॅलेस्टीनी नागरिकांनी आश्रय घेतला आहे, त्यांच्यापर्यंत अन्न पोहोचवण्यासाठी एक मार्ग तयार करावा अशी मागणी संयुक्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांनी केली आहे.

**विमानं रद्द**

दरम्यान, एअर इंडियानं इस्राएलमधील तेल अवीव इथं जाणाऱ्या आणि येणाऱ्या आपल्या विमानांची उड्डाणं येत्या शनिवार म्हणजे 14 तारखेपर्यंत रद्द केली आहेत. इस्रायलच्या हमास बरोबर सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची तसंच विमान कर्मचाऱ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं एअर इंडियानं म्हटलं आहे. मात्र, या कालावधीत विमानाचं आरक्षण केलेल्या प्रवाशांना सर्वतोपरी सहाय्य्य केलं जाईल, असंही कंपनीनं स्पष्ट केलं आहे.

**राजनाथ**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून चार दिवस इटली आणि फ्रान्सच्या दौऱ्यावर जात आहेत. सर्वप्रथम ते रोम इथं इटलीचे संरक्षण मंत्री ग्विडो क्रोसेटो यांची भेट घेतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते फ्रान्सचे सशस्त्र दल मंत्री सबास्टीयन लेकोर्नु यांच्यासोबत पाचव्या वार्षिक संरक्षण संवादात भाग घेतील. दोन्ही देशांदरम्यान औद्योगिक सहकार्यासह व्यापक द्विपक्षीय संरक्षण संबंध आहेत. रोम आणि पॅरिस या दोन्ही शहरांमध्ये राजनाथ सिंह संरक्षण

उद्योगातील कंपन्यांचे मुख्याधिकारी आणि प्रतिनिधींसोबत औद्योगिक सहकार्यातील संभाव्य संधींवर चर्चा करणार आहेत.

**<u>तांझानिया-राष्ट्रपती</u>**

तांझानियाच्या राष्ट्रपती सामिया सुलुहु हसन यांचं चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर काल नवी दिल्लीत आगमन झालं असून त्या आज नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत द्विपक्षीय संवाद साधतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आमंत्रणावरुन, सामिया हसन तांझानियाच्या राष्ट्रपती झाल्यानंतर प्रथमच भारत दौऱ्यावर आल्या आहेत. राष्ट्रपती भवनात त्यांचं समारंभपूर्वक स्वागत करण्यात येत आहे. त्यानंतर त्या राजघाट इथं जाऊन महात्मा गांधी यांच्या समाधीवर पुष्पांजली वाहतील. मोदी यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा झाल्यानंतर त्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. तांझानियाच्या राष्ट्रपती उद्या व्यवसाय आणि गुंतवणूक मंचाच्या बैठकीत सहभागी होतील.

**<u>सीतारामन</u>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल वाराणसीतल्या बनारस हिंदू विद्यापीठ इथं आयआयटीने आयोजित केलेल्या विद्यार्थी समुपदेशन कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासाठी तसंच देशाच्या भविष्यासाठी काम केलं पाहिजे. त्याचप्रमाणे तणाव विरहित राहण्याचा प्रयत्न करत विद्यार्थ्यांनी त्यांचे काम आणि त्यांचे जीवन यामध्ये संतुलन राखले पाहिजे, असं यावेळी त्या म्हणाल्या. केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात मानसिक आरोग्यासाठी 1200 कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्याचे फायदे मिळत असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. आयुष्मान भारत अंतर्गत मानसिक आजारी रूग्णांवर उपचाराचीही व्यवस्था करण्यात आली असल्यांचं त्यांनी सांगितलं.

**<u>हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.</u>**

**<u>एयर शो</u>**

भारतीय वायु दलाचा 91 वा वर्धापनदिन काल मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वर्धापनदिनाचा मुख्य सोहळा काल उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पार पडला. तिथल्या बमरौली तळावर वायु दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या संचलनात पॅरा जम्पर्सनी विशेष थरारक कसरती सादर केल्या. या समारंभात मिग-21 विमानांना औपचारिक निरोप देण्यात आला तर वायु दलात नुकत्याच सामील झालेल्या सी - 295 मालवाहू विमानांनी प्रथमच सहभाग नोंदवला.

दुसऱ्या जागतिक महायुद्धात सहभागी होऊन अतुलनीय कामगिरी बजावलेल्या दुर्मिळ मौल्यवान अशा टायगरमॉथ आणि हार्वर्ड विमानानीही यामध्ये सहभाग घेतला. सारंग विमानांनी प्रथमच पाच विमानाच्या समूहाद्वारे एकत्रित प्रात्यक्षिकं सादर केली. सूर्यकिरण, आकाशगंगा विमानांच्या कसरतींनीही प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं.

**<u>भारत-युएई</u>**

भारत आणि सौदी अरेबिया दरम्यान काल विद्युत आंतरजोडणी, हरित आणि निर्मल हायड्रोजन आणि पुरवठा साखळी या क्षेत्रातील परस्पर सहकार्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. केंद्रीय ऊर्जा आणि अपारंपरिक

उर्जामंत्री आर. के. सिंग आणि सौदी अरेबियाचे समपदस्थ अब्दुल अझीझ बिन सलमान अल सौद यांनी या करारावर स्वाक्षरी केली. रियाध इथं साजऱ्या केल्या जाणाऱ्या मेना हवामान सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर हा करार करण्यात आला. उभय देशांमध्ये कठीण आणीबाणीच्या परिस्थितीत विद्युत देवाणघेवाण, हरित आणि निर्मल हायड्रोजन आणि अपारंपरिक उर्जेची सहनिर्मिती तसच सुरक्षित, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण पुरवठा साखळीची निर्मिती या बाबींवर या करारात प्रामुख्यानं लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.

**<u>निवडणूक-तारीख</u>**

राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगण, छत्तीसगढ आणि मिझोरम या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांची घोषणा निवडणूक आयोग आज नवी दिल्ली इथं करणार आहे. त्यासाठी दुपारी बारा वाजता पत्रकार परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. यासोबतच संबंधित राज्यांमध्ये आचार संहिता लागू होईल. आयोगाच्या अनेक पथकांनी या पाच राज्यांना भेट देऊन निरीक्षणं नोंदवली आहेत.

**<u>सिक्कीम-पूर</u>**

सिक्कीमच्या पूरग्रस्त भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य पूर्ण गतीनं सुरु आहे. या पुरांमध्ये मरण पावलेल्यांची संख्या 33 वर गेली आहे, यामध्ये लष्कराचे नऊ जवान आहेत, असं सिक्कीम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं सांगितलं. 105 लोक अद्याप बेपत्ता आहेत. अडीच हजार लोकांना पुराच्या पाण्यातून वाचवण्यात आलं तर सुमारे सात हजार लोक अठ्ठावीस निवारा केंद्रांमध्ये आश्रयाला आहेत. सुमारे दीड हजार घरांचं नुकसान झालं आहे.

**<u>सिक्कीम शहीद</u>**

सिक्कीममध्ये मंगळवारी झालेल्या ढगफुटीमुळे तिस्ता नदीला पूर येऊन लष्कराची छावणी वाहून गेली. यात मूळचे बीड जिल्ह्यातले जवान पांडुरंग तावरे बेपत्ता झाले होते. तीन दिवसांनंतर त्यांचं पार्थिव हाती लागलं आहे. त्यांच्या पार्थिव देहावर आज काकडहिरा या त्यांच्या मूळ गावी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती तहसीलदार बालाजी चितळे यांनी दिली आहे.

**<u>उत्तराखंड बस अपघात</u>**

उत्तराखंडमध्ये नैनिताल जिल्ह्यात काल रात्री एक प्रवासी बस खोल दरीत कोसळून सात जण ठार आणि 22 जण जखमी झाले. हरियानाच्या हिसार जिल्ह्यातील शालेय शिक्षक नैनितालची सहल आटोपून या बसने परतत असताना हा अपघात झाला. राज्य आपत्ती निवारण दलानं इतरांच्या मदतीनं पंचवीस जणांना सुखरुप वाचवलं.

**<u>अमित शहा</u>**

केंद्र सरकारनं देशातल्या सर्व सहकारी संस्थांना मजबूत करण्यासाठी अनेक पावले उचलली असून त्या अंतर्गत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी देशभरातल्या निबंधक कार्यालयांचं संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याबरोबरच 13 राज्यांमधल्या 1 हजार 851 कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या संगणकीकरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे 225 कोटी रुपयांच्या या योजनेसाठी एक मध्यवर्ती प्रकल्प देखरेख विभाग स्थापन केला जाईल.

या योजनेमुळे या कार्यालयांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि एकसूत्रीपणा येऊन नागरिकांना सुलभ रीतीनं सेवा मिळू शकतील.

**आशियाई-स्पर्धा**

पुढील आशियाई क्रिडा स्पर्धा 2026 मध्ये जपानच्या नागोया शहरात होणार आहेत. चीनमध्ये हांगचौ इथं काल समाप्त झालेल्या एकोणिसाव्या आशियाई क्रिडा स्पर्धेच्या समारोप सोहोळ्यात नागोया शहराकडे ध्वज सोपवण्यात आला. भारताचा हॉकीपटू पी. आर. श्रीजेश यानं भारतीय पथकाचं नेतृत्व केलं. अतिशय दिमाखात पार पडलेल्या समारोप सोहोळ्यात दोन हजारहून अधिक कलाकारांनी सहभागी देशांमधील प्रेम आणि एकता दर्शविणारे कलाविष्कार सादर केले. पंचेचाळीस देशांचे बारा हजारहून अधिक खेळाडूंनी विविध प्रकारच्या 40 खेळांमध्ये भाग घेतला.

या स्पर्धेत 28 सुवर्ण, 38 रौप्य आणि 41 कास्य अशी एकंदर 107 पदकं जिंकत भारतानं पदकतालिकेत चौथं स्थान पटकावलं. आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकांची कमाई करणाऱ्या सर्व भारतीय खेळाडूंचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी अभिनंदन केलं आहे.

**विश्व-करंडक**

आयसीसी पुरुष विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं आपल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा काल चेन्नई इथं सहा गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियानं विजयासाठी ठेवलेलं 200 धावांचं आव्हान भारतानं त्रेचाळीसाव्या षटकात चार गड्यांच्या बदल्यात पार केलं. विराट कोहली आणि के एल राहुल यांची 165 धावांची भागिदारी निर्णायक ठरली. रविंद्र जडेजानं पाहुण्यांचे तीन गडी बाद केले.

---

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**